

मेट्रो - ३ चे भुयारीकरण १०० टक्के झाल्याचे कॉर्पोरेशनकडून सांगण्यात आले असून अपलाइन मार्गावरील या भुयारीकरणास ४३ दिवसांचा कालावधी लागला. तर यात ५५८ काँक्रिट रिंग्सचा वापर करण्यात आला.

# भुयारीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण

## मुंबई सेंट्रल स्थानकात खोदकामाचा अंतिम टप्पा पार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेला आयाम देण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा-वांद्रे-सीप्झ असा भुयारी मेट्रो-३ मार्ग उभारण्यात येत असून, या मार्गावरील मुंबई सेंट्रल स्थानकावर बुधवारी ४२ वा आणि प्रकल्पातील अंतिम भुयारीकरणाचा टप्पा पार पडला. त्यामुळे मेट्रो-३ चे भुयारीकरण १०० टक्के झाल्याचे कॉर्पोरेशनकडून सांगण्यात आले असून, अपलाइन मार्गावरील या भुयारीकरणास ४३ दिवसांचा कालावधी लागला. तर यामध्ये ५५८ काँक्रिट रिंग्सचा वापर करण्यात आला.

कामगारांच्या सुरक्षिततेशी तडजोड केली नाही. आधुनिक तंत्रज्ञान वापरले. संपूर्ण टीमसाठी हे एक जिकिरीचे काम होते. मेट्रो-३ प्रकल्प पूर्ण झाल्यावर जलद, सुरक्षित प्रवासाचा अनुभव मिळेल.

- एस.के. गुप्ता, संचालक (प्रकल्प), मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन

### कोणती स्थानके?

मेट्रो-३ मार्गातील सर्वात लांब पट्ट्यांपैकी एक असलेल्या पॅकेज-३ मध्ये

- मुंबई सेंट्रल
- महालक्ष्मी
- सायन्स म्युझियम
- आचार्य अत्रे चौक
- वरळी

### तानसाने काय केले ?

८३७ मीटरचे पॅकेज-३

अंतर्गत महालक्ष्मी मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकापर्यंतचे ८३७ मीटरचे आव्हानात्मक भुयारीकरणाचे काम रॉबिन्सच्या टीबीएम तानसा-१ ने यशस्वीरीत्या पूर्ण केले.

ऐतिहासिक वारसा इमारती, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती, सध्याचा मेट्रो मार्ग, रेल्वे मार्ग, नदी व कठीण भौगोलिक रचना असलेला परिसर आदींच्या खालून व अगदी जवळून हा मार्ग जात असल्याने भुयारीकरण करणे आव्हानात्मक होते. भुयारीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. या क्षणाचे साक्षीदार होताना आनंद होत आहे.

- अश्विनी भिडे, व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन